# FIRST INFORMATION REPORT
**(Under Section 154 Cr.P.C.)**
प्रथम खबर अहवाल
(कलम १५४ फौजदारी प्रक्रिया संहिता)

1. **District (जिल्हा):** सांगली **P.S.(ठाणे):** तासगांव
**Year (वर्ष):** 2023
**FIR No.(प्रथम खबर क्र.):** 0287
**Date and Time of FIR (प्र. ख. दिनांक आणि वेळ):**20/06/2023 20:25

2.

| S.No. (अ.क्र.) | Acts (अधिनियम) | Sections (कलम) |
|---|---|---|
| 1 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7 |
| 2 | भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम, १९८८ | 7A |

3. (a) **Occurrence of offence (गुन्ह्याची घटना):**
1. **Day(दिवस):** मंगलवार
**Time Period (कालावधी):** पहर 5
**Date From (दिनांक पासून):** 20/06/2023
**Date To ( दिनांक पर्यंत):** 20/06/2023
**Time From (वेळेपासून):** 13:58 बजे
**Time To (वेळेपर्यंत):** 15:10 बजे

(b) **Information received at P.S. (माहिती मिळालेले पोलीस ठाणे):**
**Date (दिनांक ):** 20/06/2023 **Time (वेळ):** 20:01 बजे

(c) **General Diary Reference (रोजनामचा संदर्भ ):**
**Entry No. (नोंद क्र.):** 034
**Date & Time (दिनांक आणि वेळ):** 20/06/2023 20:01 बजे

4. **Type of Information (माहितीचा प्रकार):** लेखी

5. **Place of Occurrence (घटनास्थळ):**
1.(a) **Direction and distance from P.S.(पोलीस ठाण्यापासून दिशा व अंतर):**
पूर्व, 10 किमी **Beat No. (बिट क्र.):**
(b) **Address (पत्ता):** ग्रामपंचायत कार्यालय, मण

(c) **In case, outside the limit of this Police Station, then**
**(या पोलीस ठाण्याच्या हद्दीबाहेर असल्यास):**
**Name of P.S.(पोलीस ठाण्याचे नाव):**
**District(State) (जिल्हा(राज्य)):**



Scanned with OKEN Scanner

6. **Complainant / Informant (तक्रारदार/माहिती देणारा):**

(a) **Name (नाव):** शैलेश गणपती बेडगे

(b) **Father's/Husband's Name(वडील / पती चे नाव) :**

(c) **Date/Year of Birth (जन्म तारीख/वर्ष):** 2000

(d) **Nationality (राष्ट्रीयत्व):** भारत

(e) **UID No. (यु.आय.डी. क्र.):**

(f) **Passport No.(पारपत्र क्र.):**

**Date of Issue (दिल्याची तारीख):**

**Place of Issue (दिल्याचे ठिकाण):**

(g) **ID details (Ration Card,Voter ID Card,Passport,UID No.,Driving License, PAN)** ओळखपत्र विवरण (राशन कार्ड ,मतदाता कार्ड ,पासपोर्ट, यूआईडी सं., ड्राइविंग लाइसेंस, पॅन कार्ड )

| S.No. (अ.क्र.) | ID Type (ओळखपत्राचा प्रकार) | ID Number (ओळखपत्राचा क्रमांक) |
|---|---|---|
| 1 | | |

(h) **Address (पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Address Type (पत्याचा प्रकार) | Address (पत्ता) |
|---|---|---|
| 1 | वर्तमान पता | मणेराजुरी गुजर मळा,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |
| 2 | स्थायी पता | मणेराजुरी गुजर मळा,तासगांव,सांगली,महाराष्ट्र,भारत |

(i) **Occupation (व्यवसाय):**

(j) **Phone number (फोन नं.):**

**Mobile (मोबाइल नं.):**

7. **Details of known/suspected/unknown accused with full particulars (माहीत असलेल्या /संशयीत/अनोळखी आरोपीचा संपूर्ण पत्ता):**

| S.No. (अ.क्र.) | Name (नाव) | Alias (उर्फनाव) | Relative's Name (नातेवाईकाचे नाव) | Present Address (वर्तमान पता) |
|---|---|---|---|---|
| 1 | श्री. महादेव विठ्ठल जाधव | | | 1. गणेश कलनी, तासगाव,तासगाव, सांगली,महाराष्ट्र,भारत |

8. **Reasons for delay in reporting by the complainant/informant (तक्रारदार/माहिती देणा-याकडून तक्रार करण्यातील विलंबाची कारणे):**

9. **Particulars of properties of interest (संबंधीत मालमत्तेचा तपशील):**

| S.No. (अ.क्र.) | Property Category (मालमत्ता वर्ग) | Property Type (मालमत्ता प्रकार) | Description (वर्णन) | Value(In Rs/-) (मुल्य (रू. |
|---|---|---|---|---|



Scanned with OKEN Scanner

10 **Total value of property (In Rs/-)**
**(चोरीस गेलेल्या मालमत्तेचे एकूण मुल्य (रु. मध्ये)):**

11. **Inquest Report / U.D. case No., If any**
**(इन्क्वेस्ट अहवाल/ अकस्मात मृत्यू प्रकरण क्र.,जर असल्यास)):**

| S.No. (अ.क्र.) | UIDB Number (यु.आय.डी.बी.क्र.) |
|---|---|

12. **First Information contents (प्रथम खबर हकीकत ):**
वर्दी जबाब दि. 20.06.2023

मी शैलेश गणपती बेडगे, वय 23 वर्ष व्यवसाय:- शेती, रा. मणेराजुरी गुजर मळा, ता.तासगाव जि. सांगली. मो. नं.9022258457

मी वरील ठिकाणचा रहिवाशी असून मी माझा चुलत भाऊ संतोष उत्तम बेडगे यांचे घरी राहणेस आहे. मी सप्टेंबर 2022 मध्ये शासनाचे यशवंत-वसंत घरकुल योजनेमधून घर मिळण्यासाठी जिल्हा परिषद सांगली येथे अर्ज केलेला होता.

जिल्हा परिषद सांगली यांचेकडील आदेशान्वये मला नोव्हेंबर 2022 मध्ये यशवंत-वसंत घरकुल योजने अंतर्गत घर बांधणेसाठी 1 लाख 20 हजार रूपये मंजूर झालेले आहेत. सदर योजने अंतर्गत पहिला हप्ता मंजूर होणेसाठी मी गटविकास अधिकारी पंचायत समिती तासगाव यांना ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी श्री. जाधव यांचेमार्फतीने अर्ज केलेला होता. त्यानंतर सदर योजनेचा पहिला हप्ता 40,000/- रूपये हा आठवडयापुर्वी माझे सांगली जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा मणेराजुरी येथे जमा झाला होता. सदरचा हप्ता जमा झालेनंतर मी ग्रामविकास अधिकारी जाधव यांची भेट घेवून घरकुल योजनेचा पहिला हप्ता जमा झालेचा सांगून घरकुल योजनेचा दुसरा हप्ता मंजुर होणेकरीता पंचायत समिती तासगाव येथे शिफारस पाठविणेबाबत विनंती केली असता, ग्रामविकास अधिकारी श्री.जाधव यांनी माझेकडे 10,000/- रूपये लाचेची मागणी केलेली आहे. तसेच सोबत येत असताना माझा चुलत भाऊ संतोष बेडगे यास चर्चेकरीता घेवून येणेबाबत सांगितले आहे.

मला, श्री. जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी यांना पैसे देण्याची इच्छा नसल्याने मी दि. 08.05.2023 रोजी अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालयात संपर्क करून माझी ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांचेविरूध्द लाच मागणीची तक्रार असलेचे कळवून मी तक्रार देणेस सांगली येथे येवू शकत नसल्याचे सांगून आपण मणेराजुरी येथे येवून माझी तक्रार घेणेबाबत विनंती केली. त्याप्रमाणे पोलीस उप अधीक्षक श्री. पाटील साहेब यांनी मला आम्ही मणेराजुरी येथे येवून संपर्क करतो असे सांगितले. त्यानंतर पोलीस उप अधीक्षक श्री.पाटील साहेब यांनी मला संपर्क करून मणेराजुरीच्या अलीकडे करोली फाटा येथे बोलावून घेतले. त्यावेळी मी व माझा भाऊ संतोष बेडगे असे मोटारसायकल वरून त्याठिकाणी हजर झालो असता पोलीस उप अधीक्षक श्री.संदीप पाटील साहेब यांनी त्यांची व त्यांचे सोबत असले पोलीस निरीक्षक श्री. पुजारी साहेब, दोन पंचांची व सापळा पथकाची ओळख करून दिली.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला ब्युरोच्या कार्यप्रणालीची माहिती देवून त्यांनी दिले सुचनेवरून दोन्ही पंचानी मला माझी तक्रार विचारली त्याप्रमाणे मी तक्रार सांगीतली. त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला माझा लेखी तक्रारी अर्ज देण्यास सांगितला त्याप्रमाणे मी लेखी तक्रारी अर्ज हजर केला. त्यानंतर माझे तक्रारी अर्जावर पोलीस निरीक्षक श्री. पुजारी साहेब व दोन्ही पंचांनी वाचून सहया केल्या.

त्यानंतर श्री. जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी यांचेविरुद्ध मी दिले लाच मागणी तक्रारीचे अनुषंगाने पुजारी साहेब यांनी पंचा समक्ष पडताळणी करण्याचे निश्चित केले. श्री. पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हॉईस रेकॉर्डर दाखवून त्याची माहिती दिली. त्यानंतर मला व पंचांना पडताळणीच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना देऊन डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझ्या गळयामध्ये अडकविला. त्यानंतर मी व पंच बेपारी असे माझे मोटार सायकल वरुन व भाऊ संतोष बेडगे हा त्याचे मोटारसायकलवरून रवाना होवून ग्रामपंचायत कार्यालय मणेराजुरी येथे ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांची भेट घेवून परत श्री. पुजारी साहेब थांबलेल्या ठिकाणी हजर झालो.

सदर पडताळणी कार्यवाही मध्ये पुजारी साहेबांनी मला व पंच बेपारी यांना पडताळणीची हकीकत विचारून तसेच व्हॉईस रेकॉर्डरमध्ये झालेले रेकॉर्डींग ऐकुण झालेल्या संभाषणाची खात्री केली. त्यामध्ये ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांनी माझे घरकुल योजनेचा दुसरा हप्ता मंजुर करणेबाबत चर्चा करून ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी मला



Scanned with OKEN Scanner

"साहेबांना द्यायला लागत्यात" असे म्हणाले. त्यावर मी त्यांना "किती द्यायच" असे विचारले असता ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी "सांगितलय की.....काय तर थोड फार कमी करा" असे म्हणाले. त्यावर माझा चुलत भाऊ संतोष बेडगे यांनी ग्रामविकास अधिकारी जाधव यांना "तुम्ही दहा हजार म्हणताय की नाय.....दहा हजार याच्या परिस्थीतीच्या मानान, तुम्हा विचार करा आई-वडील नाहीत याचे" असे म्हणाले असता त्यावर ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी मला "बर एक... सात द्या आणि मोकळ व्हा जावा" असे म्हणाले. त्यावर मी, ग्रामविकास अधिकारी जाधव यांना "सात हजार?" असे विचारले असता ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी "हा" असे म्हणून माझेकडे सात हजार रूपये लाचेची मागणी केली आहे. तसेच ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी मला "पाच द्या.... परत दोन द्या...दोन-तीन दिवसान" असे म्हणून पाच हजार रुपये लागलीच घेवून येण्याचे सांगितल्याचे निष्पन्न झाले आहे.

लोकसेवक श्री. जाधव, ग्रामविकास अधिकारी यांनी मला लाचेची रक्कम लागलीच घेऊन येण्यास सांगितले आहे परंतू लाच रक्कम कोणत्या ठिकाणी घेवून येण्यास सांगितले नसल्याने सापळा कारवाईचे ठिकाण निश्चित करण्यासाठी श्री. पुजारी साहेब यांनी मला, ग्रामविकास अधिकारी श्री.जाधव यांना फोनव्दारे संपर्क करून सापळा कारवाईचे ठिकाण निश्चित केले. त्याप्रमाणे श्री. पुजारी साहेब यांनी ब्युरोच्या कार्यप्रणालीप्रमाणे फोनव्दारे पडताळणी कारवाई केली असता ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी मला ते तासगाव येथे असल्याचे सांगून मला तासगावमध्ये बोलविले असल्याचे निष्पन्न झाले. तसेच ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी मला माझेकडील घरकुल योजनेची दुसऱ्या हप्त्याची कागदपत्रे ही पंचायत समिती येथे जमा करणेबाबत सांगितल्याने, श्री.पुजारी साहेब यांनी पंचायत समिती तासगाव येथे सापळा कारवाई आयोजित करण्याचे सर्वानुमते निश्चित केले.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी तासगाव गावचे अलिकडे जावून सापळा पुर्व कारवाई करण्याचे निश्चित केलेने आम्ही सर्व करोली फाटा येथून रवाना होवून तासगाव गावचे अलिकडे शासकीय महिला तंत्रनिकेतन कॉलेज जवळ येवून सुरक्षीत ठिकाणी थांबलो.

त्यानंतर पोलीस निरीक्षक श्री. पुजारी साहेब यांनी मला लाच रक्कम हजर करण्यास सांगितले असता मी 5,000 /- रुपये नोटा हजर केल्या. श्री.पुजारी साहेब यांनी सदर नोटांचे नंबर कागदावर लिहुन घेवून सदर कागदावर पंच व श्री. पुजारी साहेब यांनी सहया केल्या. श्री. पुजारी साहेब यांनी मला व पंचांना डिजीटल व्हाईस रेकॉर्डर, अँथ्रासिन पावडर, अल्ट्राव्हायलेट दिवा याची माहिती दिली. त्यानंतर मी हजर केलेल्या नोटांना पथकातील अंमलदार यांचेकरवी अँथ्रासीन पावडर लावुन सदर नोटा माझे शर्टचे समोरील डावे बाजुस असले खिशामध्ये ठेवल्या. त्यानंतर श्री.पुजारी साहेब यांनी सापळा पुर्व कारवाई पुर्ण केली. त्यानंतर सापळा कारवाई दरम्यान माझे मोबाईलवर ग्रामविकास अधिकारी जाधव यांचा फोन येत असल्याचे मी पुजारी साहेब यांना सांगितले. श्री.पुजारी साहेब यांनी मला ग्रामविकास अधिकारी जाधव यांचा फोन उचलण्यास सांगून फोन लाऊड स्पिकवर घेणेच्या सुचना देवून डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु केला. त्यावेळी मी, ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांना "बोला की" असे म्हणाले असता ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी "दिल नाय ते कागदपत्र" असे विचारले. त्यावर मी "नाय जमा केल, पावसात अडकलोय" असे म्हणालो. त्यावर ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी "तु गेला नाहीस का तासगावात द्यायला, मला वाटल गेला असशील द्यायला" असे म्हणाले. त्यावर मी, ग्रामविकास अधिकारी श्री.जाधव यांना "मी यायला लागलोय तुमची तर गाठ घेवून जातो की मग" असे म्हणालो असता ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी "पाऊस चालू झालाय तासगावात, बग कस होतय उगाच, ये नाहीतर राहुदे" असे म्हणाले असता मी, ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांना "न्हाय माघारी येत नाय आता, तुम्हाला मी कुठ येतोय बघून सांगतो" असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर बंद करून त्यामधील फाईल रेकॉर्डीग झाल्याची खात्री केली.

त्यानंतर पुजारी साहेब यांनी मला, दोन्ही पंचांना व सापळा पथकातील अंमलदार यांना सापळा कारवाईच्या अनुषंगाने योग्य त्या सुचना दिल्या. त्यानंतर पुजारी साहेब यांनी डिजीटल व्हाईस रेकॉर्डर सुरु करुन त्यास असले लेसव्दारे माझ्या गळयामध्ये अडकविला. त्यानंतर मी व पंच बेपारी असे रवाना होवून पंचायत समिती तासगाव येथे दाखल झालो. आमचे पाठोपाठ पुजारी साहेब, पाटील साहेब, पंच नं.2 जमादार व सापळा पथक असे त्यांचेकडील वाहनाने पंचायत समिती कार्यालय तासगाव येथे येऊन परिसरात सापळा लावुन थांबले.

त्यानंतर मी व पंच नं.1 बेपारी असे पंचायत समिती कार्यालय मध्ये टपाल शाखा येथे जावून मी माझे घरकुल योजनेची कागदपत्रे जमा केली. त्यानंतर मी कार्यालयाचे बाहेर येवून ग्रामविकास अधिकारी श्री.जाधव यांना फोन करून मी पंचायत समिती जवळ आलो असल्याचे व घरकुल योजनेची कागदपत्रे पंचायत समिती येथे जमा केली असल्याचे सांगितले. त्यावेळी ग्रामविकास अधिकारी जाधव यांनी मला "हिकड या की एसटी डेपो पशी या....दत्त मंदीर जवळ....तहसिल ऑफीसच्या इथे.....दत्त माळाला" असे म्हणून मला दत्त मंदीर जवळ बोलविल्याने मी व



Scanned with OKEN Scanner

पंच नं.1 बेपारी असे पंचायत समिती तासगाव येथून रवाना होवून तासगाव ते सांगली जाणारे रोडवरील तहसिल ऑफीस तासगाव जवळील दत्त मंदीर (दत्त माळ) येथे आतमध्ये जावून थांबलो. काही वेळानंतर ग्रामविकास अधिकारी श्री.जाधव यांनी माझे मोबाईलवर फोन करून "जरा मी विटयाला गेलोय, जरा पावण्याचा अॅक्सीडेंट झालाय गडबडीत हाय, काय येवू नको आता" असे म्हणून फोन कट केला. त्यानंतर ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव हे आम्हास भेटण्यास येणार नसल्याने मी व पंच नं.1 बेपारी असे सापळा पथक थांबले ठिकाणी गेलो. त्यावेळी पुजारी साहेब यांनी माझ्याकडील डिजीटल व्हाईस रेकॉर्डर काढून घेवून बंद केला.

लोकसेवक ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांनी माझ्याकडे पैशाबाबत निरोप दिल्यानंतर पुन्हा सापळा कारवाई आयोजीत करण्याचे श्री.पुजारी साहेब यांनी निश्चित करून सापळा कारवाई तात्पूरती मागे घेण्याचे सर्वानुमते निश्चित केले. त्यानंतर मी व सापळा पथक असे अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे दाखल झालो. त्यानंतर पुजारी साहेब यांनी पुढील कारवाई ही अॅन्टी करप्शन ब्युरो कार्यालय सांगली येथे पुर्ण केली.

त्यानंतर मी वेळोवेळी ग्रामपंचायत कार्यालयात जावून ग्रामविकास अधिकारी श्री.जाधव यांचेबाबत चौकशी केली असता ते रजेवर असलेचे कार्यालयातील कर्मचारी यांचेकडून समजले आहे. त्यानंतर मी वेळोवेळी ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव यांची भेट घेणेकरीता ग्रामपंचायत कार्यालय येथे गेलो परंतू त्यांची भेट होवू शकली नाही. तसेच त्यांना वेळोवेळी संपर्क करण्याचा प्रयत्न केला असता त्यांची भेट होवू शकली नाही. यावरून माझ्याकडून आता ग्रामविकास अधिकारी श्री. जाधव हे लाच रक्कम स्विकारणार नसल्याची मला खात्री झालेने त्याबाबत मी पुजारी साहेब यांना कळविले. त्यानंतर पुजारी साहेबांनी मला व माझा भाऊ संतोष बेडगे असे आम्हा दोघांना अॅन्टी करप्शन कार्यालय, सांगली येथे येणे बाबत सुचना दिल्या. त्याप्रमाणे आम्ही अॅन्टी करप्शन कार्यालय येथे पुजारी साहेब यांचेसमक्ष हजर झालो. पुजारी साहेबांनी माझा सविस्तर जबाब नोंद केला व सदरची कारवाई स्थगित करण्याचे ठरविले.

लोकसेवक श्री. जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी यांनी मला जिल्हा परिषद सांगली यांचेकडून मंजूर यशवंत-वसंत घरकुल योजनेचा दुसरा हप्ता मंजुर होणेकरीता पंचायत समिती तासगाव येथे शिफारस पाठविणेसाठी माझेकडे स्वत: करीता व साहेबांकरीता 10,000/- रूपये लाचेची मागणी करून तडजोडी अंती 7,000/- रूपयांची मागणी करून, लाच रक्कमेपैकी 5,000/- रूपये लागलीच घेवून येण्यास सांगून उर्वरित 2,000/- रूपये हे दोन-तीन दिवसांत घेवून येण्यास सांगितल्याचे निष्पन्न झाल्याने श्री.पुजारी साहेब यांनी लोकसेवक श्री. जाधव, ग्रामविकास अधिकारी मणेराजुरी यांचेविरूध्द तासगाव येथे सापळा कारवाई आयोज

13. **Action taken:** **Since the above information reveals commission of offence(s) u/s as mentioned at Item No. 2.** (केलेली कारवाई: बाब क्र.२ मध्ये नमूद केलेल्या कलमान्वये वरील अहवालावरून अपराध घडल्याचे.)

(1) **Registered the case and took up the investigation:** (प्रकरण नोंदविले आणि तपासाचे काम हाती घेतले):

BHANUDAS RAGHUNATH NIBHORE(I (Inspector)) / PCMH84476 **or** (किंवा)

(2) **Directed (Name of I.O.)** (तपास अधिका-याचे नाव):

**Rank** (पद): **No.**(क्र.):

**to take up the Investigation** (ला तपास करण्याचे अधिकार दिले) **or** (किंवा)

(3) **Refused investigation due to** (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला):



Scanned with OKEN Scanner

or (ज्या कारणामुळे तपास करण्यास नकार दिला)

(4) **Transferred to P.S.**
(गुन्हा दुसरीकडे पाठविला असल्यास त्या पोलीस ठाण्याचे नाव):

**District** (जिल्हा):
**on point of jurisdiction** (को क्षेत्राधिकार के कारण हस्तांतरित) .

**F.I.R. read over to the complainant / informant,admitted to be correctly recorded and a copy given to the complainant / informant free of cost.** (प्रथम खबर तक्रारदाराला/खबरीला वाचून दाखविली, बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले आणि तक्रारदाराला/खबरीला खबरीची प्रत मोफत दिली.) S.G.B

**R.O.A.C.**(आर. ओ .ए .सी.)

14 **Signature/Thumb impression of the complainant / informant.**
(तक्रारदाराची/खबर देणा-याची सही/अंगठा):
S.G.B

15.**Date and time of dispatch to the court**
(न्यायालयात पाठवल्याची तारीख व वेळ):

पोलीस स्टेशन ऑफिसर
घारगांव पोलीस ठाणे

**Signature of Officer in charge, Police Station**
(ठाणे प्रभारी अधिका-याची स्वाक्षरी)

**Name** (नाव): BHANUDAS RAGHUN
**Rank**(पद): I (Inspector)
**No.**(सं.): PCMH84476



Scanned with OKEN Scanner

**Attachment to item 7 of First Information Report** (प्रथम खबरीतील मुद्दा क्र. ७ ला जोडपत्र): **Physical features, deformities and other details of the ( If known / seen )**(संशयीत/आरोपीचे (माहित असलेल्या/पाहिलेल्या) शारीरिक वैशिष्ट्ये, व्यंग आणि इतर तपशील))

| S.No.(अ.क्र.) | Sex (लिंग) | Date/Year of Birth (जन्म तारीक/ वर्ष) | Build (बांधा) | Height (cms.) (उंची(सें. मी.)) | Complexion (रंग) | Identification Mark (s) (ओळखीच्या खुणा) |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 |
| 1 | पुरुष | | | | | चेचक के दाग: NO |

| Deformities/ Peculiarities | Teeth (दात) | Hair (केस) | Eyes (डोळे) | Habit(s) (सवयी) | Dress Habit(s) (पोषाखाच्या सवयी) |
|---|---|---|---|---|---|
| 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 |
| | | | | | |

| Language /Dialect (भाषा / बोलीभाषा) | Place Of (का स्थान) | | | | | Others (इतर) |
|---|---|---|---|---|---|---|
| | Burn Mark (भाजल्याच्या खुणा) | Leucoderma (कोड) | Mole (तिळ) | Scar (व्रण) | Tattoo (गोदण) | |
| 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 |
| | | | | | | |

**These fields will be entered only if complainant/informant gives any one or more particulars about the suspect/accused.**
(जर तक्रारदार/माहिती देणा-याने संशयीत/आरोपीविषयी एक किंवा त्यापेक्षा अधिक तपशील दिल्यास फक्त यातील रकान्यांची नोंद घेतली जाईल.)



Scanned with OKEN Scanner